# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
## Maharashtra Electricity Regulatory Commission


स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

क्र : मविनिआ/माअअ/70/2018/266 दि. 15.10.2018

प्रति,
श्री. प्रदिप सखाराम मयेकर,
1/11, चुनाभट्टी श्रमिक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
हिल रोड, सायन, चुनाभट्टी, मुंबई - 400022.

**विषय :-** आपला दि. २६.०९.२०१८ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. 26.09.2018 रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 6 (1) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. 11.10.2018 रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Sought |
|---|---|---|
| 1 | चुनाभट्टी श्रमिक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, हिल रोड, सायन, चुनाभट्टी, मुंबई 400022 (पूर्वीची कलेक्टर चाळ स्मशान रोड, सायन, चुनाभट्टी, मुंबई 400022) या पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेतील घर क्रमांक 1/12 मधिल निवासी श्री. कृष्णकुमार गिरिजाशंकर सोनी यांनी त्यांच्या घराचे सोसायटी वा महानगरपालिका यांच्या पूर्व अनुमतीशिवाय (N.O.C.) खाली 2 आणि वर 2 असे एकूण 4 भाग करून त्यामध्ये 4 स्वतंत्र वीज मीटर बसवीले आहेत. असे वीज मीटर कोणत्या नियमाखाली देण्यात आले त्या नियमांची प्रत तसेच त्या 4 जणांनी संबंधित कंपनीस सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती मला देण्यात याव्यात. | आपणांस हवी असलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही.<br><br>तसेच दि. १२.१०.१८ रोजी आपणांशी झालेल्या चर्चेनुसार, आपणांस नेमके कोणते दस्तावेज हवे आहेत हे स्पष्ट हवेत याचा बोध होत नाही. |

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रकरण 1 मधील 2 (फ) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो;

आयोगाच्या कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई हे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम १९ (१) अन्वये सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी